दिनांक :– १२.०५.२०२३

## प्रेसनोट

**लोकसेवक श्री भगवान नारायण लहाने,मुख्याध्यापक, श्री. शिवाजी माध्यमिक विद्यालय, पुर्णा सहकारी साखरखाना ता. वसमत जि. हिंगोली. यांनी ६०,०००/–रू. लाचेची मागणी करून दि.११.०५.२०२३ गेजी सापळा कार्यवाही दरम्यान ४०,०००/– (पहिला हप्ता) लाचेची रक्कम स्विकारल्याने त्याचे विरूध्द पोस्टे वसमत ग्रा. जि.हिंगोली येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

---

दिनांक ११.०५.२०२३ रोजी यातील तक्रार यांनी तक्रार दिली होती की,तक्रारदार हे शिवाजी माध्यमिक विद्यालय, पुर्णा सहकारी साखरखाना, ता.वसमत जि. हिंगोली या शाळेत अनुकंपा तत्वावर शिपाई या पदावर तीन वर्ष मानधनावर दि.०१.११.२०२२ रोजी रूजु झाले आहेत तक्रारदार यांचे शालार्थ प्रणाली मध्ये नाव समावष्ठि करण्यासाठी प्रस्ताव माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परीषद हिंगोली येथे पाठविण्याकरीता लोकसेवक लहाने, मुख्याध्यापक यांनी पंचासमक्ष ६०,०००/– रू लाचेची मागणी केल्याची तक्रार दिली होती. त्यानंतर तक्रादार यांचे तक्रारीची पडताळणी केली असता लोकसेवक लहाने, मुख्याध्यापक यांनी पंचासमक्ष ६०,०००/– रू लाचेची मागणी करून ४००००/– रू. (पहिला हप्ता) लाच रक्कम स्विकारण्यास सहमती दिल्याचे निष्पन्न झाल्याने दि.११.०५.२०२३ रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान पंचासमक्ष लोकसेवक लहाने यांनी ४००००/– रू. (पहिला हप्ता) लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले.

त्यावरून लोकसेवक लहाने, मुख्याध्यापक, श्री. शिवाजी माध्यमिक विद्यालय, पुर्णा सहकारी साखरखाना ता. वसमत जि. हिंगोली यांचे विरूध्द पोलीस स्टेशन वसमत ग्रामीण गुरन १०३/२०२३ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच पुढील कारवाई सुरू आहे.

ही कामगिरी डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, पोलीस उप अधीक्षक श्री निलेश सुरडकर यांचे मार्गदर्शना खाली, श्री. प्रफुल्ल अंकुशकर, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांनी श्री. विजय पवार, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली, पोहेकॉ श्री तान्हाजी मुंढे, ज्ञानेश्वर पंचलींग,रविंद्र वरणे, गजानन पवार, भगवान मंडलीक, पोना श्री गोविंद शिंदे, पोशि श्री राजाराम फुपाटे, शिवाजी वाघ, चापोना श्री शेख मन्नान अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**डॉ. राजकुमार शिंदे. पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मो.नं. ९६२३९९९९४४**
**श्री. निलेश सुरडकर, पोलीस उप अधीक्षक, मो.नं.९८२२२००९५९**
**टोल फ्री क्र.–१०६४, दुरध्वनी क्र.०२४५६–२२३०५५,**

कार्यालय पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली